# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. समाजशास्त्र

द्वितीय वर्ष (सत्र ३ व सत्र ४)

२०१७–१८

प्रती : १०००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| तिसरे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| चौथे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

## समाजशास्त्रीय विचारवंत (SC-302)
## सत्र – ३
## प्रकरण क्रमांक १ ते ५

---

**प्र १) ऑगस्ट कॉम्ट यांचा मानवी समाजाच्या प्रगतीचा नियम स्पष्ट करा. गुण : १५**

**प्रास्ताविक –** तीन अवस्थांचा नियम वा मानवी प्रगतीचा नियम याबाबतचे विचार मांडून कॉम्ट यांनी समाजशास्त्रात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली. मानवी बुद्धिमत्तेशी निगडित असलेली प्रत्येक ज्ञानशाखा विकसित होत असताना ती प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या परंतु एकानंतर एक अशा विशिष्ट क्रमाने तात्त्विक अवस्थांमधून मार्गक्रमण करते. या तीन अवस्था – १) ईश्वरशास्त्रीय / असत्य अवस्था या अवस्थेच्या तीन उपावस्था – अ) सर्व वस्तू चेतनावाद आ) अनेकेश्वरवाद इ) एकेश्वरवाद २) आध्यात्मिक / अमूर्त अवस्था ३) वैज्ञानिक / प्रत्यक्ष अवस्था.

**प्र. २ – 'समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे' हे विधान मार्क्सच्या विचारांच्या आधारे स्पष्ट करा. गुण : १५**

**प्रास्ताविक –** मार्क्सने मानवी समाजात अस्तित्वात असलेल्या वर्गभेदास त्याच्या सामाजिक विवेचनाचा मूलाधार बनविले आहे. त्याच्या सुप्रसिद्ध 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ची सुरुवात समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे अशी आहे. मार्क्सच्या मते समाजात वर्गाचा उगम हा व्यक्तीच्या उत्पादनपद्धतीशी असलेल्या संबंधातून होतो. उत्पादन पद्धतीत व्यक्ती जी भूमिका बजाविते त्यावरून तिचा वर्ग ठरतो.

मानवाच्या इतिहासाचा विचार करता सुरुवातीच्या काळात स्वामी–दास, नंतर सरंजामदार – भूदास, भांडवलदार–कामगार असे वर्ग निर्माण झाले. आधुनिक समाजातील वर्ग हे मिळकतीच्या आधारावर अस्तित्वात आले. उत्पादन साधनांवर मालकी असणाऱ्यांचा वर्ग–मालकवर्ग व शारीरिक श्रम करून उत्पादन करणारा कामगारवर्ग – एक शोषक व दुसरा शोषित. नफा मिळविण्याच्या अतिरेकी इच्छेतून मालकाकडून कामगारांचे शोषण होते याची जाणीव होऊन कामगार संघटित होऊन मालकाविरुद्ध संघर्ष करतील. मालकाची सत्ता उलथून टाकतील व वर्गविहीन समाज अस्तित्वात येईल असे मार्क्सचे भाकीत आहे.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) गुण : १५**

**१) सामाजिक विचारांची वैशिष्ट्ये व महत्त्व लिहा.**

**सामाजिक विचारांची वैशिष्ट्ये –** १) सामाजिक विचारांची निर्मिती सामाजिक समस्या सोडविण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नातून होते २) समाजाचे नियोजन, सामाजातील विविध प्रक्रियांचे व समाजाचे स्वरूप समजावून घेण्यामधून निर्मिती ३) सामाजिक विचार हे परिस्थितीसापेक्ष परंतु काही विचार सर्व काळी सर्व समाजांना लागू पडणारे. ४) सामाजिक विचार मानवी प्रगतीचे निदर्शक. **सामाजिक विचारांचे महत्त्व –** दोन प्रकारचे तात्त्विक व व्यावहारिक.

**२) समाजशास्त्रातील प्रमुख प्रतिमाने स्पष्ट करा.**

समाजशास्त्रातील प्रमुख प्रतिमाने – उत्क्रांतीवादीय, संरचनात्मक कार्यान्वयी, समाजिक संतुलन व संघर्षावर भर देणारा दृष्टिकोन.

**३) स्पेन्सरचे मानवी समाजाचे वर्गीकरण स्पष्ट करा.**

समाजाचे दोन प्रकार. सैनिकी व औद्योगिक समाज या दोन्ही समाजांची वैशिष्ट्ये.

**४) डरखीमचा श्रमविभाजनाचा सिद्धांत विशद करा.**

श्रमविभाजनाचा डरखीमला अभिप्रेत अर्थ सामूहिक जाणीव, संघप्रधान/ व्यक्तिप्रधान समाज, यांत्रिक व जैविक ऐक्य, दडपणात्मक व सहकार्यात्मक कायदे, सामाजिक वातावरण, संघप्रधान व व्यक्तिप्रधान समाजात श्रमविभाजन कसे असते याचे विवेचन.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

**१) समाजशास्त्रीय सिद्धांत व व्यावहारिक ज्ञान यातील फरक**

सैद्धांतिक ज्ञान संकल्पनांमार्फत व्यक्त ते अमूर्त, व्यावहारिक ज्ञान प्रत्यक्ष सामाजिक जीवनाचे निरीक्षण करून वर्णनात्मक पद्धतीने मांडले जाते, सिद्धांत व्यक्त करण्याची भाषा काटेकोर, गणिती स्वरूपाची तर व्यावहारिक ज्ञान व्यक्त करण्याची भाषा बोलीभाषा.

**२) कॉम्टची प्रत्यक्षवादाची संकल्पना.**

प्रत्यक्षवाद म्हणजे विज्ञानवाद, प्रत्यक्षवादाची वैशिष्ट्ये व उद्दिष्टे.

**३) मार्क्सचा भांडवलवाद**

भांडवलशाहीचा उदय, भांडवलशाहीचे फायदे/ तोटे.

**४) स्पेन्सरने सांगितलेले मानवी शरीर व समाज यामधील साम्य भेद.**

**साम्य –** समाज आणि शरीर या दोन्हीतही वैयक्तिक घटकांना वेगळे अस्तित्व नाही. दोन्हीचा हळूहळू विकास, सूक्ष्मतेतून सुरुवात, अस्तित्वासाठी भोवतालच्या वातावरणावर अवलंबून, एकात्मता व परस्परावलंबन, रचना विविध घटकांच्या एकत्रीकरणातून उदय–वाढ–विकास या मार्गाने वाटचाल, एखाद्या भागात दोष निर्माण झाल्यास त्याचा परिणाम संपूर्णावर.

**भेद –** शरीराचा विकास निसर्गत: पण समाजाचा विकास समाजातील व्यक्तींवर अवलंबून, पेशींना शरीरात स्वतंत्र अस्तित्व नाही, पण व्यक्तीला समाजात स्वतंत्र अस्तित्व, शरीरात प्रत्येक अवयव विशिष्ट काम करतो पण असे समाजातील घटकांबाबत नाही.

**प्रश्न ५) क्षेत्रीय कार्य –** आपल्या आजूबाजूला आत्महत्येच्या घटना घडतात. तसेच वर्तमानपत्रात आत्महत्येच्या बातम्या येतात. डरखीमच्या विचारांनुसार त्या कोणत्या प्रकारात मोडतात हे मांडा. **गुण : २०**

---

## समाजशास्त्रीय विचारवंत (SC - 401)
## सत्र – ४
## प्रकरणक्रमांक ६ ते ९

**प्रश्न १) वेबरच्या मते प्रॉटेस्टंट धर्मपंथामुळे भांडवलशाहीला कशी चालना मिळाली ? गुण : १५**

**प्रास्ताविक –** वेबरच्या मते नैतिक तत्त्वे आणि आर्थिक व्यवस्था यांचा प्रत्यक्ष संबंध असतो. धर्माचे आर्थिक जीवनावरील परिणाम वेबरने स्पष्ट केले. त्यासाठी कन्फ्युशियस, हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम आणि ज्यु धर्मांची निवड केली. प्रॉटेस्टंट धर्मपंथ आणि भांडवलशाहीचा उदय – भांडवलशाहीची वैशिष्ट्ये, बेंजामिन फ्रँकलीनची तत्त्वे, प्रॉटेस्टंट पंथातील कॅल्व्हिनवादी आचारशास्त्रातील प्रमुख तत्त्वे, प्रॉटेस्टंट धर्माच्या शिकवणुकीतील तत्त्वे.

**प्रश्न २. चार्लस कूले यांनी मांडलेल्या 'प्रतिबिंबित स्वत्वाची कल्पना' आणि 'प्राथमिक समूह' या संकल्पना स्पष्ट करून या दोहोंमधील परस्परसंबंध लिहा. गुण : १५**

**प्रास्ताविक –** कूले यांच्या मते व्यक्ती आणि समाज यांच्यातील अन्योन्य संबंधांचा अभ्यास समाज – मानसशास्त्रीय दृष्टिकोनातूनच पद्धतशीररीत्या होऊ शकतो. प्रतिबिंबित स्वत्वाची कल्पना या कल्पनेची निर्मिती आणि तिचा सखोल अभ्यास कूलेंनी समाज–मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केला. **प्रतिबिंबित स्वत्वाची कल्पना–** १) आपण दुसऱ्या व्यक्तीला कोणत्या स्वरूपात दिसतो यासंबंधी व्यक्तीने मनात आडाखे बांधणे २) समोरची व्यक्ती आपल्यासंबंधी कोणत्या प्रकारे मत बनविते याची कल्पना मनात योजणे ३) वरील प्रक्रियांमधून व्यक्तीच्या मनात स्वत:बद्दलची एक प्रतिमा अथवा मूल्यमापनात्मक प्रतिक्रिया तयार होते. स्वत:संबंधीचा अभिमान, आत्मविश्वास अथवा कमीपणाची भावना यातूनच घडते. **प्राथमिक समूह** – वैशिष्ट्ये, व्यक्तीला सामाजिक जीवनप्रवाहाशी जोडणारा व संस्कारित जीवनाची दिशा स्पष्ट करून दाखविणारा हा दुवा.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन) गुण : १५**

**१) तर्कसंगत व तर्कविसंगत कृती विषयीचे परेटोचे विचार स्पष्ट करा.**

तर्कसंगत कृती – उद्दिष्ट व साधनांमध्ये एकोपा, व्यक्तींना व तिऱ्हाइतांना अभिप्रेत कृतीचा अर्थ सारखाच. तर्कविसंगत कृती – उद्दिष्ट व साधन यांमध्ये एकोपा नाही. व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ अशा दोन्ही दृष्टिकोनातून तर्कसंगत नसतात. तर्कविसंगत कृतीचे प्रकार – नाही – नाही, नाही–होय, होय–नाही, होय–होय.

**३) सोरोकीनचे सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार लिहा.**

कौटुंबिक संबंध, करारात्मक संबंध, सक्तीचे संबंध.

**२) भ्रांत तर्काचे प्रकार स्पष्ट करा.**

घोषणा, अधिकार, भावनांना अनुरूप अशी विधाने, तोंडी पुरावा.

**४) सोरोकीनचे क्रांतीच्या संदर्भातील विचार मांडा.**

सामाजिक क्रांती ही नैसर्गिक बाब नाही त्यामुळे समाजाचे कल्याण होण्याची शक्यता कमी. क्रांती ही परिवर्तन प्रक्रियेतील बाह्य घटक त्यामुळे बरेचदा हे परिवर्तन घातक, क्रांतीमुळे सामाजिक ऐक्य, प्रगती, व्यक्तिविकासात अव्यवस्था निर्माण होते.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**१) वेबरचे अधिकारांचे प्रकार**

तर्क संगत कायदेशीर, पारंपरिक, दैवी गुणांमुळे मिळणारे अधिकार.

**२) सामाजिक प्रक्रियेविषयी कुलेचे विचार**

संघटनात्मक व विघटनात्मक बाजूंचा विचार, विनिमय या सामाजिक प्रक्रियेद्वारे मानवी संबंधांची निर्मिती व विकास शिक्षण ही एक प्रभावी विनिमय प्रक्रिया.

**३) श्रेष्ठींच्या अभिसरणाचा सिद्धांत.**

श्रेष्ठी म्हणजे प्रत्येक क्षेत्रातील स्वत:च्या हिमतीवर श्रेष्ठ पदावर आलेल्या व्यक्ती, श्रेष्ठींचे दोन प्रकार– शासन करणारे व न करणारे. श्रेष्ठी व सर्वसामान्यांमधील फरक– राजकीय श्रेष्ठी २ प्रकार– मॅकिअवली विरोध सिद्धांत सिंह आणि लांडगे राजकीय सत्ता श्रेष्ठींच्या एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे.

**४) सोरोकीनचे संस्कृतीचे प्रकार**

भावनात्मक, चेतनात्मक, आदर्शात्मक संस्कृती.

**प्र.५. क्षेत्रीय कार्य –** वेबरच्या विचारांच्या संदर्भात आपल्या स्वत:च्या अनुभवा आधारे नोकरशाहीवर टिपण तयार करा. **गुण : २०**

---

## ग्रामीण समाजशास्त्र (SC-302)

## सत्र ३

## प्रकरण क्रमांक १,३,५ ते १०

---

**प्रश्न १. ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.** **गुण : १५**

**प्रास्ताविक –** प्राथमिक संबंध व्यवस्था, कृषी व्यवसाय व सामुदायिक भावना ही वैशिष्ट्ये आढळून येणारा, निश्चित भूभागावर वास्तव्य करणारा मानवी समूह म्हणजेच ग्रामीण समुदाय होय. आजही भारतातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात वास्तव्यास असलेले दिसून येतात. या दृष्टीने ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. वैशिष्ट्ये –अलगता, स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था, स्वायत्तता, रूढींचे प्राबल्य, संयुक्त कुटुंबाचा प्रभाव, जजमानी व्यवस्था, बलुतेदारी पद्धती, साधे व प्रामाणिक जीवन.

**प्रश्न २) ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांवरील जातिव्यवस्थेचा प्रभाव स्पष्ट करा.** **गुण : १५**

**प्रास्ताविक –** पारंपरिक ग्रामीण समाजरचनेचा आधार जात हीच होती. आधुनिक समाजात मात्र शेतीवर आधारित वर्ग निर्माण होऊ लागले आहेत.

**प्रभाव –** जात व ग्रामीण आर्थिक जीवन – १) उत्पादनपद्धती (कामाची विभागणी जातीनुसार), उपभोग्यता, कर्जबाजारीपणा (डॉ. आर. के. नेहरू– कनिष्ठ जाती–कर्जबाजरीपणा), राहण्याचे ठिकाण, गतिशीलता २) जात व संयुक्त कुटुंबपद्धती ३) जात व शैक्षणिक जीवन ४) जात व धार्मिक जीवन ५) जात व राजकीय जीवन ६) जात आणि सामाजिक मूल्ये.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) गुण : १५**

**१) 'कुटुंबवाद' ही संकल्पना स्पष्ट करा.**

संपूर्ण ग्रामीण जीवनावर कुटुंबाचा प्रभाव आहे. यालाच 'कुटुंबवाद' म्हणतात. प्रभाव असलेली अंगे – कुटुंबाद्वारे विवाहसंस्थेचे नियमन, कुटुंब सामाजिक जबाबदारीचा एक महत्त्वाचा घटक, सामाजिक नियम व आदर्श निश्चिती, ग्रामीण राजकीय क्षेत्रात प्रभाव, सहकार्यावर आधारित संबंधांचे स्वरूप, उत्पादन – उपभोग व विनिमयाचे एक केंद्र, धर्म व पितृ पूजेचे महत्त्व, रूढीपरंपरांचे साम्राज्य, कौटुंबिक संरक्षण.

**२) ग्रामीण समुदायातील मंदिरांचे व ग्रामदैवतांचे महत्त्व मांडा.**

मंदिरे– प्रत्येक खेड्यात मंदिरे, त्यांना देखभालीसाठी इनाम म्हणून काही जमिनी, मंदिरांची कार्ये. ग्रामदैवते– ग्रामांची संरक्षक दैवते, त्यांची विविध रूपे, यात्रा व उत्सवांमध्ये विविध जातींची भूमिका.

**३) स्वातंत्र्यपूर्व काळातील जमीनविषयक संबंध स्पष्ट करा.**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात प्रामुख्याने भूस्वामित्वाच्या रयतवारी, महावारी व जमीनदारी या पद्धती निरनिराळ्या प्रांतात होत्या.

**४) समुदाय विकास योजनेचा ग्रामीण जीवनावरील प्रभाव लिहा.**

बहुसंख्य लोकांना योजनेची माहिती, शेतीमध्ये प्रगती, आरोग्यविषयक सुविधा, पूरक उद्योगधंद्यांना चालना, रस्ते, वाहतुकीच्या, पाणीपुरवठ्याच्या सोयी, शिक्षण प्रसार, ग्रामीणांच्या मनोवृत्तीत बदल, ग्रामीण जनतेला लोकशाही मूल्यांची जाणीव.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन) गुण : १५**

**१) ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व**

कृषि व्यवसायातील मागासलेपण, ग्राम– भारतीय संस्कृतीचे उगमस्थान, सांस्कृतिक विविधता, ग्रामीण समस्या, नियोजन कार्यक्रम.

**२) ग्रामीण वर्गव्यवस्था.**

शेती हा ग्रामीण स्तररचनेचा आधार. ३ वर्ग –जमीनदार व खेड्यातील सावकारांचा वर्ग, जमीनदारांना खंड देऊन त्यांच्या जमिनी कसणारी कुळे व भूमिहीन मजूर, शेती व्यवसायाला पूरक असणारा पण बिगर शेती व्यवसाय करणाऱ्या कारागिरांचा वर्ग.

**३) ग्रामीण कुटुंबाच्या कार्याच्या स्वरूपातील बदल.**

कुटुंबाच्या कार्यात प्रजनन, मुलांचे पालनपोषण, सामाजिकीकरण व सामाजिक स्थान प्राप्त करणे ही महत्त्वाची समजली जाणारी कार्ये बहुतांशी आहेत. तरीही कौटुंबिक अस्मिता, मुले, वडील माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन इत्यादीत फरक पडत आहे. वैयक्तिक पात्रतेवरून नवी सामाजिक स्थाने निर्माण झाली आहेत. कौटुंबिक परंपरेचे सातत्य शहराच्या संपर्कामुळे कमी झाले आहे. कुटुंबाचे नियंत्रणही कमी झाले आहे.

**४) सहकार चळवळीला मिळालेले यश.**

आर्थिक लाभ, सामाजिक व नैतिक लाभ, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील यश.

**प्रश्न ५) क्षेत्रीय कार्य –** ग्रामीण लघु व कुटीर उद्योगधंद्यांवर माहिती गोळा करून टिपण तयार करा. **गुण : २०**

---

# नागरी समाजशास्त्र (SC - 402)
## सत्र ४
## प्रकरण क्रमांक २,३,४,११ ते १६

**प्रश्न १) विसाव्या शतकातील जलद नागरीकरणास कारणीभूत घटक कोणते ? गुण : १५**

**प्रास्ताविक –** जगातील बहुतेक राष्ट्रांनी जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाचा मार्ग स्वीकारलेला दिसून येतो. विसाव्या शतकात तर आर्थिक विकासासाठी विविध राष्ट्रांची स्पर्धा लागलेली दिसून येते. या नागरीकरणाच्या जलद प्रक्रियेला कारणीभूत घटक– औद्योगिक क्रांती, व्यापारी, शेती क्रांती, वाहतूक व दळणवळण यांतील वाढ, शिक्षणाच्या सोयीत वाढ, प्रशासकीय सोयी सुविधा, सुरक्षितता, शहर नियोजनाचे नवीन आराखडे.

**प्रश्न २) नगर नियोजनाची आवश्यकता सांगून नगरनियोजनाची मूलतत्त्वे स्पष्ट करा. गुण : १५**

**प्रास्ताविक –** विसाव्या शतकात नागरीकरण प्रक्रिया व नगरवाद याचा लोकांनी 'जीवन जगण्याचा मार्ग' म्हणून स्वीकार केला आहे. वाढत्या नागरीकरणा बरोबर वाढत्या समस्यांची तीव्रता कमी कशी करता येईल आणि भावी काळात नगरातील लोकांना सुसंस्कृत व सुखी जीवन कसे जगता येईल या दृष्टीने नागरी समाजातील विघटनात्मक प्रक्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नगर नियोजनाचा अवलंब केला जातो.

नगरातील समस्या सोडविण्यासाठी, समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी नगरनियोजनाची आवश्यकता आहे.

**नगरनियोजनाची मूलतत्त्वे –** नागरी वाहतूक व्यवस्थेचे नियंत्रण आणि नियोजन, जमीन वापरावर नियंत्रण आणि नियोजन, झोपडपट्टीवर नियंत्रण ठेवणे, अल्प उत्पन्न असणाऱ्या लोकांसाठी गृहनिर्माण योजना, विभागीकरण, आवश्यक सुविधा पुरविणे, अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावणे, शहर सौंदर्य, शेजारी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न, स्वच्छता राखणे.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन) गुण : १५**

**१) प्राचीन भारतात नगरांचे कोणते प्रकार होते ?**

**प्रकार –** नगर, पतन, द्रोणामुखी, खेता, खरवटा, निगमा, राजधानी, दुर्गा, सेनामुखी, शानिया, मठ, विहार, धार्मिक स्थळे.

**२) स्थलांतराचे प्रकार लिहा.**

**प्रकार –** अंतर्गत स्थलांतर, आंतरराष्ट्रीय स्थलांतर.

**३) आधुनिक कुटुंबाची वैशिष्ट्ये लिहा.**

**वैशिष्ट्ये –** मर्यादित आकार, प्रजोत्पादन व संतती संगोपनाबाबतचा वेगळा दृष्टिकोन, आर्थिक गरजांची पूर्तता. धार्मिकतेचे कमी प्रमाण, लहान समूहाचे लाभ.

**४) भावी काळातील नगरांचे स्वरूप स्पष्ट करा.**

भावी काळात नगरांचे स्वरूप कसे असेल याबाबतचे काल्पनिक नमुने शरद कोपर्डेकर यांनी दिलेले आहेत. अंतराळातील तरंगती नगरे, जमिनीखालील भुयारी नगरे, समुद्रातील तरंगती नगरे.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**१) ग्रामीण नागरी सातत्य**

ग्रामीण व नागरी समुदायात फरक असला तरी शुद्ध स्वरूपात ग्रामीण किंवा नागरी असा समाज आढळणे कठीण. काही शास्त्रज्ञांच्या मते या दोन स्वतंत्र व्यवस्था आहेत. तर अनेक विचारवंतांनी याला विरोध करून ग्रामीण नागरी सातत्याची कल्पना मांडली. वीर्थ, आर–इ. पाहल, पोकॉक, मॅक आयव्हर व पेज इ. चा यात समावेश आहे.

**२) झोपडपट्ट्यांच्या निर्मूलनासाठीच्या उपाययोजना –**

भावी काळात वाढ होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक, सुविधा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे. स्वस्त घरांची निर्मिती करणे. खेड्यात रोजगार उपलब्ध करून देणे, प्रौढ शिक्षणाचे वर्ग सुरू करून शिक्षणाचे सुसंस्कार घडवून आणणे महत्त्वाचे.

**३)भिक्षावृत्तीची कारणे**

आर्थिक, सामाजिक, जैविक, धार्मिक कारणे, नैसर्गिक आपत्ती

**४) नगरांची कार्ये**

कार्ये–संरक्षण, शासकीय व राजकीय, व्यापारविनिमय, औद्योगिक, खनिज व औद्योगिक शहरे, विविध मार्गांचे केंद्रीभवन, धार्मिक व सांस्कृतिक, क्रीडा व आरोग्यप्रवर्तक कार्ये.

**प्रश्न ५) क्षेत्रीय कार्य –** भारत सरकाराच्या 'स्वच्छ भारत अभियान' या योजनेबाबत माहिती माहिती मिळवून त्याआधारे टिपण तयार करा. **गुण : २०**

---

## भारतीय समाज (SC-303)
## सत्र ३
## प्रकरण क्रमांक १ ते ६

---

**प्रश्न १ ) प्राचीन भारतातील सामाजिक परिस्थितीचे थोडक्यात वर्णन करा.** **गुण : १५**

**प्रास्ताविक –** वैदिक कालपासून मध्ययुगापर्यंत म्हणजे १२ व्या शतकापर्यंत भारतात अनेक राज्ये व साम्राज्ये झाली. लहान लहान राजांपासून चंद्रगुप्त मौर्य, समुद्रगुप्त, हर्षवर्धनासारखे मोठे सम्राट होऊन गेले. वेगवेगळे धर्म व पंथही अस्तित्वात होते. परंतु सर्वत्र एकच भारतीय संस्कृती होती व समान मूल्ये व परंपरा जपणारे समाजजीवन होते. **प्राचीन भारतातील सामाजिक व्यवस्था** – नागरी जीवन– नगरांची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती, नगरांची चोख व्यवस्था, कारागिरांना राजाश्रय, ग्रामीण जीवन– बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहत असत. सुखी, सुसंस्कृत समाजजीवन, वर्णाश्रमधर्माचे समाजात पालन, स्त्रियांचे स्थान– वैदिक कालापासून मध्ययुगापर्यंत स्त्रियांच्या समाजातील स्थानात बदल, शिक्षण पद्धती – प्राचीन भारतीय समाज शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत प्रगत अवस्थेला पोहोचला होता. धार्मिक शिक्षणाबरोबरच इतर अनेक विषयांचे, कलाकौशल्यांचे, व्यवसायांचे शिक्षण गुरुगृही राहून व्यक्ती घेत असे. साहित्य व कला – प्राचीन भारतातील बहुतेक सर्व राजांनी शिल्पकला, चित्रकला, खोदकाम, सुंदर बांधकाम इ.ना प्रोत्साहन दिले होते. या सर्व काळात संस्कृत, पाली, अर्धमागधी या भाषांमधून विपुल लिखाण झाले.

**प्रश्न २) ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतातील शेती, उद्योग, व्यापार इ. वर कोणते परिणाम घडून आले?** **गुण : १५**

**प्रास्ताविक –** ब्रिटिशांचा अंमल भारतात सुमारे २०० वर्षे होता. या काळात भारतीय जीवनाचा चेहरामोहरा ब्रिटिशांनी बदलून टाकला. ब्रिटिशांच्या धोरणाचे शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांवर अनेक परिणाम झाले.
शेती क्षेत्रामधील बदल – जमीन महसूल पद्धती, शेतीचे व्यापारीकरण, शेतमालाची निर्यात, उद्योगक्षेत्रावर झालेले परिणाम, परराष्ट्रीय व्यापाराचे बदललेले स्वरूप.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** **गुण : १५**

**१) ब्रिटिशपूर्व काळातील ग्रामीण समाजाची आर्थिक वैशिष्ट्ये लिहा.**

ब्रिटिशपूर्व काळात शेती हा प्रमुख व्यवसाय त्यामुळे खेड्यांमध्ये प्रामुख्याने शेतकरी वर्गाची वस्ती.
ग्रामीण समाजाची आर्थिक वैशिष्ट्ये – शेतीप्रधान अर्थव्यवस्था, शेती उत्पन्नाचे विभाजन, व्यवसायाचे कौटुंबिक स्वरूप, बलुतेदारी पद्धत, परंपरागत व्यवसाय, उपजीविकाप्रधान स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था, समुदाय संवेदना, साधी राहणी, किमान गरजा, आर्थिक विषमतेचा अभाव, भौगोलिक अलिप्तता.

**२) आर्थिक विकासाचा लोकसंख्या वाढीवर कोणता परिणाम होतो?**

परिणाम १) मृत्युदर हळूहळू नियंत्रणाखाली पण जन्मदर पूर्वीच्याच पातळीवर त्यामुळे लोकसंख्यावाढ वेगाने २) औद्योगिकीकरणाचे परिणाम ३) डरखीमचे विचार

**३) भारतीय समाजातील विवाहसंस्थेचे बदलते स्वरूप सांगा.**

विवाहसंस्थेचे बदलते स्वरूप – विवाहाच्या संस्कारात्मक स्वरूपात परिवर्तन, सगोत्र व सप्रवर विवाह बंधनात परिवर्तन, बालविवाहास विरोध, बहुविवाहावर बंधने, सतीबंदीचा कायदा व विधवा विवाहास मान्यता, विवाह विच्छेदनास (घटस्फोट) मान्यता. विवाह जुळण्याच्या पद्धतीतील परिवर्तन.

**४) जातीव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

समाजाचे भिन्न भागात विभाजन, श्रेणीरचना, भोजनावरील व सामाजिक संबंधांवरील बंधने, अस्पृश्यांवरील नागरी आणि धार्मिक बंधने, व्यवसाय निवडीवरील बंधने, विवाहावरील बंधने.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**१) ब्रिटिशकालीन कायदा व न्यायव्यवस्था.**

ब्रिटिश काळात जात/वर्गभेद नाही, पंचायतीचे महत्त्व कमी, न्यायदानाचे काम उच्च, जिल्हा, तालुका न्यायालयांमार्फत, कायद्यांचे संहितीकरण, अधिकारांचे विभाजन.

**२) भारतातील कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमातील तरतुदी**

कुटुंबनियोजनाचा नियोजित कार्यक्रम तयार करून सहा मूलभूत सोयींची तरतूद गृहीत. या तरतुदी लिहाव्यात. विवाहित स्त्री–पुरुषांनी कुटुंबनियोजन विषयक स्वीकृत करावयाचे तीन मूलभूत विचार.

**३) आधुनिक भारतीय कुटुंबाची वैशिष्ट्ये.**

विभक्त कुटुंबपद्धती, मर्यादित सदस्यसंख्या, व्यक्तिवादावर भर, स्त्री–पुरुष समानता.

**४) आधुनिक काळातील जातिव्यवस्थेतील परिवर्तनाची कारणे**

पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव, औधोगिक प्रगती, विशेषीकरण व श्रमविभागणीतील बदल, वाहतुकीच्या साधनात झालेली वाढ, शहरांचा प्रभाव, राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ, धार्मिक व सामाजिक चळवळी.

**प्रश्न ५) क्षेत्रीय कार्य –** आपल्या भोवतालच्या परिस्थितीच्या निरीक्षणा आधारे भारतीय समाजातील विविध धर्मांवर टिपण तयार करा. **गुण : २०**

---

## भारतीय समाज (SC-403)
## सत्र ४
## प्रकरण क्रमांक ७ ते ११

---

**प्रश्न १) अनुसूचित जातींच्या समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात झोलेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या. गुण : १५**

**प्रास्ताविक –** अनुसूचित जातींमध्ये सजातीयतेची स्वत:च्या हक्कांची आणि समस्यांना दूर करण्याची जाणीव निर्माण झाली नव्हती. ब्रिटिश राजवटीत या वर्गाच्या समस्या दूर करण्याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रयत्न करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता नष्ट करण्याचे प्रयत्न जोरात सुरु झाले.

**स्वातंत्र्योत्तर काळातील प्रयत्न** – घटनेतील कलमे, विशेष सवलती आणि कल्याणकारी योजना – राखीव मतदार संघ, स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था, भारतीय सदस्य समिती, आर्थिक तरतूद, राखीव जागा, शिक्षण, शेती व उद्योगासाठी मदत, योग्य घरे बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय, खासगी संस्थांकडून होणारे प्रयत्न.

**प्रश्न २) लोकसंख्येतील प्रमाण– आरोग्य व शिक्षण या मुद्द्यांच्या आधारे स्त्रियांच्या सद्य:कालीन परिस्थितीविषयी चर्चा करा. गुण : १५**

**प्रास्ताविक –** भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान आहे. शासनव्यवस्था, शिक्षण, औद्योगिकीकरण, समाज सुधारकांचे प्रयत्न, प्रसारमाध्यमे इ. घटकांमुळे स्त्रियांच्या परिस्थितीत बदल घडत गेला. संपूर्ण भारताचा विचार करता हे सर्व घटक एकसारखे कार्यरत राहिले असे नाही. पण या सर्व घटकांमुळे जाणीव जागृती निर्माण होत आहे.

**लोकसंख्या व आरोग्य आणि स्त्री–**स्त्रीचे समाजातील स्थान व दर्जा लोकसंख्येतील प्रमाणावरून लक्षात येतो. भारतीय समाजात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान आहे. स्त्रीच्या आरोग्याबाबतही दयनीय परिस्थिती आहे. **शिक्षण आणि स्त्री** – काही विकसित राज्ये वगळता स्त्री शिक्षणाबाबत भारतीय समाजात अजूनही मोठ्या प्रमाणावर उदासीनता आहे. शिक्षणक्षेत्रात मुलींच्या प्रवेशाची संख्या मुलांच्या तुलनेत बरीच कमी आहे. यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** **गुण : १५**

**१) आदिवासी समाजाची प्रमुख लक्षणे लिहा.**

**लक्षणे –** विशिष्ट भूप्रदेश, एकाच रक्तसंबंधांवर आधारित समाज, लोकसंखेचे मर्यादित प्रमाण, वाङ्मयाचा अभाव, साधी तंत्रविद्या, साधी अर्थव्यवस्था, समान धर्म, सामाजिक एकजिनसीपणा.

**२) राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग यावर टिपण तयार करा.**

भारतीय स्त्रीचा आर्थिक व सामाजिक दर्जा थोड्याफार प्रमाणात उंचावलेला असल्यामुळे स्त्रीचा राजकीय सहभागही वाढत आहे. स्त्री नेतृत्व विविध प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेतून पुढे येत आहे. निवडणुका, अत्यंत उच्च दर्जाची प्रशासकीय पदे, विविध चळवळी इ. मधून स्त्रिया आपली कामगिरी बजावित आहेत.

**३) भारतातील उच्च शिक्षणाविषयी माहिती द्या.**

उच्च शिक्षण – उच्च शिक्षणाची जबाबदारी प्रामुख्याने केंद्राकडे आहे. या क्षेत्रातही संख्यात्मक वाढ झाली तरी गुणात्मक वाढ झालेली दिसत नाही. तसेच असमतोलही आहे.

**४) नवे शैक्षणिक धोरण यावर टिपण तयार करा.**

शिक्षणाचे उद्दिष्ट, आशय व प्रक्रिया यांचा पुनर्विचार. मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा पद्धतीत सुधारणा, शिक्षणाचे व्यवस्थापन, साधनसंपत्ती आणि आढावा.

**प्रश्न ४) टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**१) अनुसूचित जातींच्या समस्या**

व्यवसाय निवडीचा अभाव, घृणित व्यवसाय करण्यास भाग पाडलेली पारंपरिक जातीव्यवस्था, वेठबिगारी, अत्यंत हलाखीचे आर्थिक जीवन, सामाजिक अन्याय व शोषण, शिक्षणापासून वंचित, सार्वजनिक ठिकाणी (पाणवठा, मंदिरे, उत्सव) प्रवेशास मनाई.

**२) आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या.**

**समस्या –** संपर्काने निर्माण होणाऱ्या समस्या, द्विभाषीपणा, वेषभूषेतील बदल, अनिष्ट प्रथांचा शिरकाव, युवागृहांचा ऱ्हास, व्यसनाधीनता, धर्म व जादू यांचा अस्त.

**३) अर्थार्जनाची क्षेत्रे आणि स्त्री**

घरगुती कामे, सहायक कामे, शारीरिक कष्टाची अकुशल स्वरूपाची कामे, कुशल व उच्च व्यावसायिक क्षेत्रातील कामे, स्वयंरोजगार व सहकारी क्षेत्रे.

**४) अनौपचारिक शिक्षणाची भारतातील गरज.**

Learning to be अहवालाद्वारे अनौपचारिक शिक्षणाच्या गरजेबाबत शिक्कामोर्तब. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यासाठी दुर्बल घटकांसाठी आवश्यक. सध्या या शिक्षणप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार.

**प्रश्न ५) क्षेत्रीय कार्य –** आपण राहत असलेल्या परिसरातील विविधतेचे निरीक्षण करून भारतीय समाजात विविधतेतून एकता कशी दिसते यावर टिपण तयार करा.

***